दारिद्रय रेषेखालील लाभार्थींनी कुटुंब नियोजन
शस्त्रक्रिया करुन घेतल्यास देण्यात येणाऱ्या
मोबदल्यात सुधारणा करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
सार्वजनिक आरोग्य विभाग
शासन निर्णय क्र.कुकका-२००६/प्र.क्र.५२/०७/कु.क.३
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक : १ ऑगस्ट,२००७

**वाचा:-** १) शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग क्र.कुकका-२००१/६६६/प्र.क्र.१३४/कु.क.३, दिनांक १३ नोव्हेंबर,२००२

२) केंद्र शासनाचे अ.शा.पत्र क्र.N.11019/2/2006-TO/Ply., दिनांक ३-११-२००६

३) केंद्र शासनाचे पत्र क्र.F.N.11019/2/2006-TO/Pt), दिनांक १६ मार्च,२००७

४) अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, पुणे यांचे पत्र क्र.राकुकका/आरसीएच/कु.क.सुधारित मोबदला/कक्ष-१५/०७, दि.१३ फेब्रुवारी,२००७

**प्रस्तावना** :- वाढती लोकसंख्या स्थीर ठेवण्यासाठी भारत सरकार व राज्य शासनांकडून अनेक योजना व उपाययोजना करुन सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत. यासाठी भारत सरकारच्या आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने निर्बिजीकरण शस्त्रक्रिया करुन घेणाऱ्या व्यक्तींना त्यांच्या मजूरीचो नुकसान भरपाई म्हणून रोख मोबदला व शस्त्रक्रियेच्या अनुषंगाने करावयाच्या खर्चासाठी कुटुंब नियोजन करणा-या व्यक्तीस प्रोत्साहानात्मक अनुदान देण्याची योजना चालू केलेली आहे. सदर योजनेसाठी राज्य शासनाकडून देखिल मोबदला म्हणून रोख रक्कम दिली जाते. भारत सरकारने कुटुंब नियोजन योजनेअंतर्गत देण्यात येणा-या मोबदल्यात प्रस्तावनेत नमूद केलेल्या दिनांक ३.११.२००६ व दिनांक १६.३.२००७ च्या पत्राव्दारे सुधारणा केली असून आता या योजनेंतर्गत दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांनी (पुरुष / स्त्री ) कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यास त्यांना रुपये ८००/- एवढया रकमेचे पॅकेज जाहिर केले आहे. तसेच दारिद्रय रेषेवरील कुटुंब नियोजन करणा-या लाभार्थ्यांसाठी दयावयाचा मोबदला हा प्रचलित दरानेच देय होईल असे कळविले आहे. या योजनेतून दयावयाच्या मोबदल्यामध्ये भारत सरकारने केलेल्या सुधारणेनुसार सुधारित मोबदला देण्याची कार्यवाही राज्यांनी करावी असे कळविले आहे. भारत सरकारच्या सुचनेनुसार राज्य शासनाच्या योजनेत सुधारणा करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** :-

भारत सरकारने कुटुंब नियोजन योजनेतंर्गत शस्त्रक्रिया केल्यावर दयावयाच्या मोबदल्यात सुधारणा करताना मोबदल्यात केलेली वाढ ही फक्त दारिद्रय रेषेखालील जे लाभार्थी कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया (पुरुष / स्त्री) करुन घेतील त्यांच्यासाठीच अनुज्ञेय राहिल. त्याच प्रमाणे दारिद्रय रेषेवरील जे लाभार्थी कुटुंब कल्याण शस्त्रक्रिया (पुरुष / स्त्री) करुन घेतील त्यांना पूर्वीच्या निर्णयानुसार मोबदला देय होईल असाही निर्णय घेतला आहे. भारत सरकारने कुटुंब नियोजन योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याच्या उद्देशाने सदर योजनेंतर्गत कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यावर लाभार्थ्यांच्या मजूरीच्या नुकसान भरपाई पोटी मोबदला देण्याची योजना सुधारीत केली आहे. सदर सुधारित योजना पूर्वलक्षी प्रभावाने दिनांक १ एप्रिल २००७ पासून राज्यात

८. या योजनेकरिता आवश्यक त्या अनुदानाची मागणी ही अतिरिक्त संचालक, आरोग्यसेवा कुटुंब कल्याण कार्यालय, पुणे यांनी केंद्र शासनाकडे करावी.

९. या बाबीवर राज्य शासनाकडून करावयाचा खर्च मुख्य लेखाशिर्ष २२११ कुटुंब कल्याण, -१०५- नुकसान भरपाई-पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-(०१)(०२) पुरुष नसबंदी शस्त्रक्रियेसाठी प्रोत्साहनात्मक मोबदला (२२११ ०५९७) या खाली दर्शवून मंजूर तरतुदीतून करावा. केंद्र शासनाकडून द्यावयाचा मोबदला राज्य आर.सी.एच.सोसायटीला केंद्र शासनातर्फे मंजूर केलेल्या निधीमधून करावा.

१०. सदर योजनेंतर्गत प्राप्त निधी व होणारा खर्च याबाबत नियमित लेखा परिक्षण करावे. तसेच पात्र प्रकरणांची Random पध्दतीने तपासणी करावी.

हा शासन निर्णय वित्त विभाग डिएफपी-११७१/६४२/९, दि.१९ मार्च १९७१ अन्वये सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग यांना दिलेल्या अधिकाराचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(प्र.म.देशमुख)
महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव

प्रति
मा.मंत्री /मा.राज्यमंत्री (आरोग्य) यांचे स्वीय सहाय्यक
संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
अतिरिक्त संचालक, आरोग्य सेवा, कुटुंब कल्याण, माता बाल संगोपन व शालेय आरोग्य, पुणे-१.
यांना विनंती करण्यात येते की, सदर शासन निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी सर्व संबंधितांना तातडीने सूचना देण्याची व्यवस्था करावी.
प्रधान सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव (आरोग्य व कु.क.) यांचे स्वीय सहाय्यक, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय,मुंबई.
आयुक्त (कुटुंब कल्याण) यांचे स्वीय सहाय्यक,सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय,मुंबई.
प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
उपसंचालक, आरोग्य सेवा, विभागीय मंडळे (सर्व)
विभागीय आयुक्त (सर्व)
आयुक्त, महानगरपालिका प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
जिल्हाधिकारी (सर्व)
संचालक, महानगरपालिका प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
प्राध्यापक, विभागीय कुटुंब कल्याण प्रशिक्षण केंद्र, नाशिक / पुणे / औरंगाबाद / नागपूर.
अधिष्ठाता / अधिक्षक, शासकीय रुग्णालये (सर्व)
जिल्हा शल्यचिकित्सक, सामान्य रुग्णालय (सर्व)
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
मुख्याधिकारी, नगरपालिका (सर्व)
वैद्यकीय आरोग्य अधिकारी, महानगरपालिका (सर्व)
विशेष अधिकारी, कुटुंब कल्याण युनिट, बृहन्मुंबई महानगरपालिका, एफ दक्षिण विभागीय कार्यालय,परळ, मुंबई.
महालेखापाल -१/२, महाराष्ट्र (लेखा परिक्षा / लेखा व अनुज्ञेयता), मुंबई / नागपूर.
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखापरिक्षा अधिकारी, मुंबई.
जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
सचिव, भारत सरकार आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय (कु.क.विभाग), निर्माण भवन,नवी दिल्ली-११० ०११.
विभागीय संचालक (कुटुंब कल्याण) भारत सरकार, ८४/२, पर्मली, १ ला मजला, दर्पण बिल्डिंग, सहकार नगर-२, पुणे-४११ ००१.
सर्व सह सचिव / उपसचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवड नस्ती, कार्यासन कु.क.१.

Fw3 gr

राबविण्यास या शासन निर्णयाव्दारे मान्यता देण्यात येत आहे. सदर सुधारित मोबदल्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे :-

२. **सदर योजने संदर्भात केंद्र शासनाने पुढीलप्रमाणे सुधारणा केली आहे :-**

१) पुरुष नसबंदीसाठी रु.५००/- व स्त्री नसबंदी करुन घेणाऱ्या व्यक्तीस रु.४५०/- देण्यात यावेत.

२) औषधे व मलमपट्टीसाठी पुरुष नसबंदी आणि स्त्री नसबंदी यासाठी अनुक्रमे रु.५०/- व रु.१००/- खर्च करण्यात यावेत.

३) पुरुष व स्त्री नसबंदीसाठी लाभार्थ्यांस समुपदेश करुन प्रवृत्त करणाऱ्या "आशा" / लिंक वर्करला रु.१५०/- व अंगणवाडी सेविकेस रु.२०/- एवढा मोबदला देण्यात यावा.

४) शासकिय संस्थेत येऊन नसबंदी शस्त्रक्रिया करणाऱ्या मान्यता प्राप्त खाजगी व्यावसायिकास (Accredited Private Provider) प्रत्येक केससाठी रु.१००/- प्रमाणे देण्यात यावेत.

५) सदर अनुदानाचा विनियोग खालील बाबींवर करण्यात येऊ नयेत.

अ) कर्मचारी वृंदाचे वेतन

ब) प्रवासभत्ता, दैनिक भत्त्याची अदायगी

क) बांधकाम कार्यक्रम

ड) कार्यालयीन उपकरणांची (संगणकाचे हार्डवेअर व सॉफ्टवेअर्ससह) आणि फर्निचर खरेदी

इ) वाहनांची खरेदी

ई) वाहनांसाठी पेट्रोल, तेल, वंगण आणि त्यांचे परिरक्षण

उ) इमारतींचे परिरक्षण

३. शासकीय आरोग्य संस्थेत दारिद्रय रेषेखालील (पुरुष / स्त्री) लाभार्थ्यांने कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यास दयावयाच्या मोबदल्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| अ. क्र. | खर्चाची बाब | पुरुष नसबंदी | | स्त्री नसबंदी | |
|---|---|---|---|---|---|
| | | सध्याचा दर | सुधारित दर | सध्याचा दर | सुधारित दर |
| १ | लाभार्थीना मोबदला | १५०/- | ५००/- | १५०/ | ४५०/- |
| २ | औषधे व मलमपट्टी (स्थानिक संस्थेच्या स्तरावर) | २५/- | २५/- | ६०/- | ४०/- |
| ३ | वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांना प्रोत्साहनात्मक मानधन | | | | |
| | अ) वै.अधिकारी (शल्यचिकि.) | १५/- | ४५/- | १५/- | १५/- |
| | ब) वै.अधिकारी (बधिरीकरण) | - | - | १०/- | १०/- |
| | क) परिचारीका | ५/- | ५/- | १०/- | १०/- |
| | ड) शिपाई | ५/- | ५/- | ५/- | ५/- |
| | इ)वाहनचालक | - | - | ५/- | ५/- |
| | ई) प्रवृत्त व पाठपुरावा करणारी व्यक्ती | - | रु.१५०/- आशा /लिंक वर्कर + रु.२०/- अंगणवाडी सेविका | ५/- | रु.१५०/- आशा /लिंक वर्कर + रु.२०/- अंगणवाडी सेविका |
| ४ | औषधे व मलमपट्टी (राज्यस्तरावर) | - | २५/- | - | ६०/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ५ | राज्य संकीर्ण निधी | - | २५/- | २५/- | २५/- |
| ६ | प्राआकेंद्र/ग्रा.रु.(जेथे कु.नि. शस्त्रक्रिया करण्यात येईल तेथे) | - | - | १५/- | १०/- |

४. शासन मान्य अशासकीय आरोग्य संस्थेत शस्त्रक्रिया केल्यास दयावयाच्या मोबदल्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे :-

| अ. क्र. | खर्चाची बाब | पुरुष नसबंदी | | स्त्री नसबंदी | |
|---|---|---|---|---|---|
| | | सध्याचा दर | सुधारित दर | सध्याचा दर | सुधारित दर |
| १ | लाभार्थींना मोबदला | १५०/- | ५००/- | १५०/ | ४५०/- |
| २ | औषधे व मलमपट्टी (स्थानिक संस्थेच्या स्तरावर) | २५/- | ५०/- | ६०/- | १००/- |
| ३ | शस्त्रक्रिया करण्यास प्रवृत्त केल्यास व पाठपुरावा केल्यास दयावयाचा मोबदला. | -- | १५०/- आशा /लींक वर्कर + रु.२०/- अंगणवाडी सेविका | ५/- | १५०/- आशा /लींक वर्कर + रु.२०/- अंगणवाडी सेविका |
| ४ | प्रोत्साहन निधी | - | रु.८०/- | - | रु.८०/- |

दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांनी कुटुंब नियोजन केल्यास वरीलप्रमाणे केंद्रीय सहाय्या व्यतिरिक्त राज्य शासनाकडून प्रचलित निर्णयानुसार देय होणारी रु.३५१/- एवढी रक्कम मोबदला म्हणून पुरुष लाभार्थ्यांनी शस्त्रक्रिया केल्यास त्यांना देय होईल.

५. शासकिय संस्थेत येऊन नसबंदी शस्त्रक्रिया करणाऱ्या मान्यताप्राप्त खाजगी व्यावसायिकास ((Accredited Private Provider) प्रत्येक केससाठी रु.१००/- याप्रमाणे मोबदला देण्यात यावा. सदर मोबदल्याची रक्कम ही केंद्र शासनाने आशा आणि AWW यांच्यासाठी मंजूर केलेल्या रक्कमेमधून किंवा कर्मचारी विकास निधीमधून खर्च करावी.

६. आशा / लिंक वर्कर यांनी प्रवृत्त केलेल्या व्यक्तीची शस्त्रक्रिया झाल्यावर ४८ तासानंतर रुग्णाचा पाठपुरावा केल्यावर त्यांना मोबदला देण्यात यावा.

७. कुटुंब नियोजन योजनेत मोबदला म्हणून दयावयाच्या रक्कमेत भारत सरकारने जी वाढ केली आहे, ती वाढ फक्त दारिद्रय रेषेखालील लाभार्थ्यांसाठी अनुज्ञेय आहे. दारिद्रय रेषेवरील लाभार्थ्यांनी कुटुंब नियोजन शस्त्रक्रिया केल्यावर भारत सरकारकडून यापूर्वी जेवढी रक्कम मोबदला म्हणून दिली जात होती, तेवढीच रक्कम यापुढेही देय होईल. तसेच राज्य शासनाकडून मोबदला देण्याबाबत निर्गमित केलेला शासन निर्णय क्र.कुकका-२००१/६६६/प्र.क्र.१३४/कु.क.३, दि.१३ नोव्हेंबर,२००२ मध्ये केलेल्या तरतूदीनुसार दारिद्रय रेषेवरील लाभार्थ्यांना अनुदान देय राहिल. रु.३५१/- एवढा मोबदला केंद्र शासनाकडून देण्यात येणाऱ्या मोबदल्या व्यतिरिक्त पुरुष नसबंदी शस्त्रक्रिया केलेल्या लाभार्थ्यांसाठी देय होता. राज्य शासनाकडील देण्यात येणारा सदर मोबदला यापुढे ही देण्यात यावा.